# महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे -१.

२८, राणीचा बाग, जुन्या सर्किट हाऊस जवळ, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१.
ई-मेल dy.commissionercd@gmail.com दुरध्वनी क्र. ०२०-२६३३०३७४


---

जाक्र मबाविआ/बा.वि/का-५/कोरोना/२०१९-२०/७४८८ पुणे दिनांक - १८ मार्च, २०२०.

अति तात्काळ/ महत्त्वाचे

प्रति,
जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी
(सर्व)

**विषय:- नोबेल कोरोना व्हायरस (covid-१९)च्या संसर्गाबाबत**
**संदर्भ:-** १. मा.सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली यांनी सुमोटो रिट याचिका क्र.१/२०२० मध्ये दिनांक १६/३/२०२० रोजी पारित केलेले निंदेश
२.शासन पत्र क्र.संकीर्ण -२०२०/प्र.क्र३५/का-०३ दिनांक १७/०३/२०२०

उपरोक्त संदर्भांकित विषयांन्वये आपणास सुचित करण्यात येते की,मा.सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली यांनी कोरोना संसर्गाचे गांर्भीय लक्षात घेवुन सुमोटो रिट याचिका क्र.१/२०२० दाखल करुन घेतली असुन सदर प्रकरणी दिनांक १६/०३/२०२० रोजी सुनावणी होवुन निंदेश निंगमित केले असुन सदर निंदेशाच्या अनुषंगाने पुर्तता अहवाल तात्काळ सादर करण्यास आदेशित केले आहे.

त्याअनुषंगाने आपले अधिनस्त जिल्हयातील बालकांची काळजी घेणाऱ्या सर्व शासकीय तसेच स्वयंसेवी संस्थांमध्ये कोरोना व्हायरस (**covid-१९**) विषयक प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे.आपले अधिनस्त जिल्हयातील बाल न्याय मंडळ / बाल कल्याण समिती मार्फत दाखल झालेल्या सर्व प्रवेशितांची आरोग्य विषयक दक्षता घेण्यात यावी. संस्थेमध्ये दाखल प्रवेशितांना सर्दी,पडसे,खोकला,ताप व इतर लक्षणे दिसताच त्यांची तात्काळ वैदयकिय तपासणी शासकीय रुग्णायलाकडुन करुन घ्यावी व त्यांना संस्थेमध्ये स्वतंत्र कक्ष तयार करुन त्यांना विशेष काळजी व आवश्यक वैदयकिय सेवा उपलब्ध होतील याची दक्षता घ्यावी तसेच सदर प्रवेशित हे संस्थेमध्ये दाखल अन्य प्रवेशितांच्या संपर्कात येणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

तसेच आपल्या अधिनस्त जिल्हयातील वाल न्याग मंडळ / बाल कल्याण समिती मार्फत नव्याने दाखल होणाऱ्या प्रवेशितांची तात्काळ वैदयकिय तपासणी शासकीय रुग्णायलाकडुन करुन घेवुन त्यांचा वैदयकिय अहवाल प्राप्त होईपर्यंत संस्थेमध्ये स्वतंत्र कक्षामध्ये निरिक्षणाखाली ठेवुन· आवश्यक ती काळजी घ्यावी वैदयकिय अहवाल प्राप्त झालेनंतर (**covid-१९**) ची लागण झाली असल्यास सदर प्रवेशितांबाबत वैदयकिय सल्ल्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.



Scanned with CamScanner

तसेच प्रवेशितांच्या वैयक्तिक व संस्था परिसरामध्ये स्वच्छता ठेवणेबाबत विषेश काळजी घेण्यात यावी .संस्थेतील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे मध्ये सर्दी,पडसे,खोकला,ताप व इतर लक्षणे दिसुन आल्यास त्वरीत वैदयकिय तपासणी व उपचार करण्याबाबत आदेशित करावे.

**तसेच संदर्भिय पत्र क्र.२** अन्वये शासनाने महिला व बाल विकास विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या महिला व बालकांसाठी कार्यरत सर्व मान्यताप्राप्त शासकीय व अशासकीय संस्थांमध्ये कोरोना विषाणु (Covid १९) चा प्रादुर्भाव रोखण्याच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत (प्रत सोबत जोडलेली आहे) तरी त्याअनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात याव्यात.

तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे आपल्या आधिनस्त जिल्हयातील बाल न्याय मंडळ / बाल कल्याण समिती मार्फत दाखल झालेल्या व नव्याने दाखल होणाऱ्या प्रवेशितांची दैनंदिन माहिती सोबत जोडण्यात आलेल्या विहित प्रपत्रामध्ये dcbalvikas@gmail.com या ईमेल आयडी वरुन उपलब्ध करुन देण्यात आलेल्या COVID -१९ या लिंकव्दारे **गुगल ड्राईव्हवर दिनांक -१८/०३/२०२० पासुन** दररोज दुपारी १.३० पर्यत सादर करण्यात यावी. सदर प्रकरणी कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा होणार नाही याची दक्षता घ्यावी व हलगर्जीपणा झाल्यास आपणास जबाबदार धरण्यात येवुन प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

सोबत- **शासनाचे दिनांक १७/०३/२०२० रोजीच्या सुचना**

उपआयुक्त(बा.वि)

महिला व बाल विकास

महाराष्ट्र राज्य,पुणे-१

Scanned with CamScanner

## प्रपत्र-१

| अ.क्र | जिल्हयाचे नाव | बालकांची काळजी घेणाऱ्या संस्थेतील एकुण प्रवेशितांची संख्या | सर्दी,पडसे,खोकला,ताप, श्वास घेण्यास त्रास इत्यादी लक्षणे दिसणाऱ्यांची संख्या प्रवेशितांची संख्या | तपासणी दिनांक | तपासणी अहवाला मध्ये किती प्रवेशितांना लागण झाली असल्याचे निष्पण्ण झाले आहे |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी

## प्रपत्र-२

| अ.क्र | जिल्हयाचे नाव | बालकांची काळजी घेणाऱ्या संस्थेतील एकुण कर्मचारी संख्या | सर्दी,पडसे,खोकला,ताप, श्वास घेण्यास त्रास इत्यादी लक्षणे दिसणाऱ्यांची संख्या कर्मचारी संख्या | तपासणी दिनांक | तपासणी अहवाला मध्ये किती अधिकारी/कर्मचारी यांना लागण झाली असल्याचे निष्पण्ण झाले आहे |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी

Scanned with CamScanner

## प्रपत्र-३

| अ.क्र | जिल्हयाचे नाव | बालकांची काळजी घेणाऱ्या संस्थेतील नव्याने दाखल होणाऱ्या प्रवेशितांची संख्या | सर्दी,पडसे, खोकला,ताप, श्वास घेण्यास त्रास इत्यादी लक्षणे दिसणाऱ्यां प्रवेशितांची संख्या | वैदयकिय तपासणी करण्यात आलेल्या प्रवेशितांची संख्या | वैदयकिय तपासणी करण्यात आलेल्या व वैदयकिय अहवाल प्रलंबित असणाऱ्या प्रवेशितांची संख्या | संस्थेमध्ये स्वतंत्र कक्षात (Isolation Room) मध्ये टेवण्यात आलेल्या प्रवेशितांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी

Scanned with CamScanner

दूरध्वनी क्र. ०२२-२२८१४९०६

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
नवीन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

---

क्र: संकीर्ण-२०२०/प्र.क्र.३५/का-०३ दिनांक : १७ मार्च, २०२०.

प्रति,
आयुक्त,
महिला व बाल विकास,
पुणे.

**विषय :- महिला व बाल विकास विभागाच्या अखत्यारीत येणा-या महिला व बालकांसाठी कार्यरत सर्व मान्यताप्राप्त शासकीय व अशासकीय संस्थांमध्ये कोरोना विषाणू(COVID-१९) चा प्रादुर्भाव रोखण्याच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत.**

महोदय,

राज्यातील कोरोना विषाणूचा(कोव्हीड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा,१८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करण्यात आला आहे.

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू करणेबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाकडून विविध सूचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत.त्यानुषंगाने महिला व बालविकास विभागाच्या अखत्यारित येणा-या सर्व शासकीय व अशासकीय संस्थांमध्ये(बालगृहे/निरीक्षणगृहे/दत्तक एजन्सीज/बाल न्याय अधिनियमांतर्गत नोंदणीकृत सर्व संस्था/ भिक्षेकरी गृह/राज्यगृहे/आधारगृहे/स्वाधारगृहे/उज्ज्वला गृहे/संरक्षण गृहे/नोकरी करणा-या महिलांसाठीचे वसतीगृह) कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सर्व शासकीय व अशासकीय संस्थांना खाली नमूद केल्यानुसार सूचना देण्यात येत आहेत-

१. विभागाच्या अखत्यारीत येणा-या संस्थांमध्ये दाखल कोणताही प्रवेशित कोरोना संसर्गीत रूग्णाच्या संपर्कात येणार नाही याची काळजी संस्थेचे प्रमुख /अधिक्षक यांनी घ्यावी.

२. उपरोक्त नमूद संस्थांमध्ये संस्थेबाहेरील अभ्यांगतास प्रवेश देण्यात येवू नये.

३. संस्थेतील एखाद्या प्रवेशितास ताप येणे/खोकला येणे/श्वसनास त्रास होणे अशी लक्षणे आढळल्यास त्यांची २४ तासाच्या आत वैद्यकीय तपासणी करण्यात यावी व आवश्यकता भासल्यास त्यांना इतर प्रवेशितांपासून विलग/वेगळे ठेवण्यात यावे.

४. कोरोना प्रादुर्भाव रोखणेसाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा तसेच जिल्हा आरोग्य यंत्रणेकडून उपलब्ध करून देण्यात येणारी आरोग्य व स्वच्छताविषयक संसाधने उपलब्ध करून घेणे, संस्थांमध्ये आवश्यक फवारणी करणे किंवा तदनुषंगिक उपाययोजना करण्याची तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

Scanned with CamScanner

५. सदर उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा,रूग्णालये, स्थानिक यंत्रणा इत्यादीसोबत आवश्यक तो समन्वय साधण्यात यावा.

६. कोरोना विषाणू प्रतिबंधाच्या अनुषंगाने शासनाच्या विविध विभाग/यंत्रणेकडून वेळोवेळी निर्गमीत होणा-या सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी.

७. प्रवेशितांना कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावापासून संरक्षित ठेवणेसाठी सॅनिटायझर, हॅन्डवाश व तदनुषंगिक साहित्य उपलब्ध करून देण्यात यावेत.

८. संस्थेमध्ये कार्यरत असणा-या सर्व कर्मचा-यांनी स्वच्छतेविषयक निकष पाळण्याची दक्षता घ्यावी.

९. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करणेबाबत आपल्या स्तरावरून सूचित करण्यात यावे.

(र.सि.जरांडे)
उप सचिव(अ.का.), महाराष्ट्र शासन.

प्रत,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे खाजगी सचिव.
मा.मंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव.
मा.राज्यमंत्री,महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव.
सर्व विभागीय उपायुक्त(महिला व बाल विकास विभाग).
सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.

Scanned with CamScanner